# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## वित्त व लेखा विभाग

## परिपत्रक

**गुणवत्ता सुधार योजनेतंर्गत केंद्रीय पध्दतीने हिशेब सादर करणेबाबत...**

सर्व संबंधित महाविद्यालय/संस्थांना कळविण्यात येते की, गुणवत्ता सुधार कार्यक्रमातंर्गत केंद्रीय पध्दतीने खालील प्रमाणे हिशेब स्वीकारण्यात येणार आहेत.

| जिल्हा/शहर | दिनांक | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|
| नाशिक | १४/०३/२०१७ | ९ ते ५ | विद्यापीठ उपकेंद्र नाशिक |
| अहमदनगर | १५/०३/२०१७ | १० ते ५ | न्यू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अहमदनगर |
| पुणे जिल्हा | १६/०३/२०१७ | १० ते ६ | वाणिज्य विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ. |
| पुणे शहर | १७/०३/२०१७ | ९ ते ५ | वाणिज्य विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ. |
| पुणे शहर | १८/०३/२०१७ | ९ ते ५ | |

***पुणे शहरातील चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळा यांचे अनुदान मंजूर प्रस्ताव संख्या जास्त असल्याने दि.१७ व १८ मार्च २०१७ अशा दोन दिवसांत महाविद्यालय/संस्थाची विभागणी करण्यात आलेली आहे. त्याची यादी विद्यापीठाच्या संकेत स्थळावर www.unipune.ac.in/Circulars /FinanceCirculars मध्ये टाकण्यात आली आहे. संबंधित महाविद्यालय/संस्थानी त्या त्या दिवशी उपस्थित राहणे अनिवार्य आहे. चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळाबरोबरच संबंधित महाविद्यालय/संस्थानी क्रिडा साहित्य/उपकरणे/बांधकाम यांचे प्रस्ताव असतील तर त्याच दिवशी केंद्रिय हिशेब तपासणी शिबीरामध्ये घेवून यावेत.***

*हिशेब सादर करणे बाबतची माहिती व तक्ते विद्यापीठाच्या संकेत स्थळावर www.unipune.ac.in/Circulars /FinanceCirculars मध्ये "QIP ACCOUNTS - STATEMENTS FOR COLLEGES & INSTITUTES FY 2016 – 17" या विषयातंर्गत उपलब्ध आहे.*

आपल्या महाविद्यालय/संस्थेचे हिशेब सनदी लेखापालांकडून तपासून/प्रमाणित करुन वर नमूद केल्याप्रमाणे शिबिरामध्ये सादर करण्यात यावेत. त्यानंतर विद्यापीठामार्फत कोणतेही हिशेब स्विकारले जाणार नाहीत व कोणत्याही प्रकारे अर्थसहाय्य अदा केले जाणार नाही.

सदर कालमर्यादेत महाविद्यालये/संस्थांकडून विद्यापीठास हिशेब सादर न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालय/संस्थेची राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे - ४११००७.
जा.क्र. वित्त/२०१६-१७/२४८२
दिनांक : ७ मार्च, २०१७

सीए (डॉ.) विद्या गारगोटे
वित्त व लेखा अधिकारी
अतिरिक्त कार्यभार

**प्रत : माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी.**

१. मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.
२. मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.